म.सं.कौ.हि.का.अर्ज ३६/२०२४

**निशाणी क्र.४२**

**अर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञ श्री.आर.व्ही.सरडे पाटील यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु–**

**०७.** माझे पदवीपर्यंत शिक्षण झाले आहे. माझे शिक्षण बारामती येथे झाले. माझे पदवीचे शिक्षण कला शाखेतून झाले आहे. मी सद्या कोठेही नोकरीस नाही. हे खरे नाही की, माझ्या घरी ट्रॅक्टर असुन तो मी चालवतो. हे खरे नाही की, माझ्याकडे वाहन चालविण्याचा परवाना आहे. मी सध्या निमगाव डाकू येथे राहतो. माझे आई–वडिल माझ्यासोबत राहतात. हे खरे नाही की, सध्या माझ्या घराचे बांधकाम चालू आहे. माझ्या वडिलांचे घर असुन ते पडलेल्या छपरांचे आहे. त्याचा घर नंबर मला सांगता येणार नाही.

**०८.** हे खरे नाही की, माझ्या घराशेजारी एकनाथ प्रकाश भोसले राहतात. भोसले व आमचा गट नं.८ आहे अगर कसे मला माहिती नाही. हे खरे नाही की, त्या गटातच मी राहतो. हे खरे नाही की, भोसले व माझ्यात संडासच्या बांधकामावरुन भांडण झाले आहे. हे खरे नाही की, त्या भांडणातून भोसले यांनी माझ्या घरच्यांच्या विरुद्ध तक्रार दाखल केली. हे खरे नाही की, घर नाही व घरावरुन भांडण झाले हे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, त्या भांडणाबाबत श्रीगोंदा कोर्टात खटला चालू आहे. हे खरे की, अर्जदार ही माझी पत्नी आहे. हे खरे की, अर्जदाराने भिगवण पोलिस ठाणेत आम्ही तिला शारिरीक व मानसिक त्रास दिला अशी तक्रार दाखल केली आहे.

**०९.** हे खरे नाही की, मी अर्जदाराच्या वडिलांना रक्कम रु.२ लाख दिल्याचे खोटे सांगतो. हे खरे की, त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे खरे नाही की, बांधकामासाठी २ लाख रुपये आणण्याकरिता मी अर्जदाराला शारिरीक व मानसिक त्रास दिला. अर्जदाराने माझ्याकडे नांदायला यावे म्हणून मी कोणतीही कायदेशीर कार्यवाही केलेली नाही. अर्जदाराला नांदण्यास नेण्याची माझी इच्छा आहे. हे खरे नाही की, अर्जदार आजारी असताना मी तिच्यावर वैद्यकीय उपचार केले नाहीत. हे खरे नाही की, अर्जदार ही वेळोवेळी आजारी असते. मी अर्जदाराला कधी व केव्हा दवाखान्यात नेले त्याची तारीख व वार मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, अर्जदार मला तिचे लग्न तिच्या मनाविरुद्ध झाल्याचे व तिला तिच्या माहेरी राहायचे

असल्याचे सांगायची हे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, सरतपासात कथन केलेला संपूर्ण मजकूर खोटा आहे.

**१०.** हे खरे नाही की, अर्जदार लग्नानंतर निमगाव डाकू येथे माझ्यासोबत राहत होती. अर्जदार तेथे केवळ ८ दिवस राहिली. त्यानंतर अर्जदार व मी तुळजापूर येथे राहत होतो. तेथे मी काम करायला गेलो होतो. तेथे मला काम मिळाले होते. तेथे माझा फळांचा स्टॉल होता. तुळजापूर नंतर मी अर्जदाराला घेऊन निमगाव डाकू येथे गेलो. तुळजापूर येथे मी भाड्याच्या खोलीत राहत होतो. खोलीचे भाडे ३ हजार होते. भाड्याची खोली कधी सोडली मला सांगता येणार नाही. आम्ही तुळजापूरला ३ ते ४ महिने राहिलो.

**११.** हे खरे की, निमगाव डाकू येथे माझी वडिलार्जित शेतजमीन आहे. हे खरे की, माझ्या नावे दुचाकी आहे. हे खरे नाही की, अर्जदाराला जादा पोटगी मिळू नये म्हणून खोटी साक्ष देतो.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2026.04.17 13:40:35 +0530

**दि.१७/०४/२०२६**

**(प्राजक्ता राजीव सबनीस),**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर,**

**ता.इंदापूर, जि.पुणे.**